क्रमांक : २८८३ / ब कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन,
मुंबई. दिनांक : १६ फेब्रुवारी, २०२६

# :: परिपत्रक ::

**विषय :- महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२६ च्या प्रथम (अंर्थसंकल्पीय) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांवरील कार्यवाहीबाबत**

**संदर्भ :- या सचिवालयाचे परिपत्रक क्र.२६४३ /ब कक्ष, दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६**

सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२६ चे प्रथम (अंर्थसंकल्पीय) अधिवेशनाकरीता सोमवार दिनांक २ मार्च,२०२६ रोजीकरीता तारांकित स्वीकृत प्रश्न विभागाकडे पाठविण्यात आले होते. तथापि, महाराष्ट्र विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या दिनांक १० फेब्रुवारी,२०२६ रोजी झालेल्या बैठकीत शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी,२०२६ रोजी सुट्टीच्या दिवशी सभागृहाची बैठक होणार असून सोमवार,दिनांक २ मार्च,२०२६ रोजी सभागृहाची बैठक होणार नसल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सबब, सोमवार,दिनांक २ मार्च,२०२६ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी शनिवार,दिनांक २८ फेब्रुवारी,२०२६ रोजी चर्चेकरीता ठेवण्यात येत आहे.

त्यानुषंगाने **शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी,२०२६ रोजी** गट क्र.१ चे प्रश्न ठेवण्यात येणार आहेत. सदर गटामध्ये १) वैद्यकीय शिक्षण मंत्री, २) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री ३) मृद व जलसंधारण मंत्री ४) उद्योग व मराठी भाषा मंत्री,५) महिला व बाल विकास मंत्री ६) ग्रामविकास व पंचायत राज मंत्री ७) कामगार मंत्री ८) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांच्या विभागांचा समावेश आहे.

( सीमा तांबे )
अवर सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति :

(१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
(२) मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री, यांचे खाजगी सचिव
(३) मा. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री, यांचे खाजगी सचिव
(४) मा.मृद व जलसंधारण मंत्री, यांचे खाजगी सचिव
(५) मा. उद्योग व मराठी भाषा मंत्री, यांचे खाजगी सचिव
(६) मा. महिला व बाल विकास मंत्री यांचे खाजगी सचिव

(७) मा. ग्रामविकास व पंचायत राज मंत्री, यांचे खाजगी सचिव

(८) मा. कामगार मंत्री, यांचे खाजगी सचिव

(९) मा. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, यांचे खाजगी सचिव

(१०) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव

(११) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित.